महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३५८ वा | दिनांक : १२/१२/२०२५ | वार : शुक्रवार




## अमित शहांनी हिंदुत्व शिकवू नये : उद्धव ठाकरे



**नागपूर :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाला हजेरी लावली. त्यानंतर पत्रकार परिषद घेत त्यांना सध्या सुरू असलेल्या अधिवेशनावर भाष्य केले. तसेच या अधिवेशनातून विदर्भासाठी काय मिळाले? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तसेच अतिवृष्टीत नुकसानग्रस्तांसाठी सरकारने कोणता प्रस्ताव पाठवला होता हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे, अशी मागणी केली. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मला हिंदूत्व शिकवू नये, असा पलटवार देखील यावेळी बोलताना उद्धव ठाकरेंनी केला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा एक व्हिडिओ ट्विट करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला होता. कोण होतास तू काय झालास तू, असे ट्विट फडणवीस यांनी ठाकरेंना उद्देशून केले होते. यावर प्रत्युत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले, मी त्यांना म्हणू इच्छितो की कोण होतास तू, काय झालास तू, भ्रष्टाचाऱ्यांना पांघरुणात घेतलेस तू.. त्यांनी एक पांघरून मंत्री तयार करायला पाहिजे. पांघरून खाते तयार केले पाहिजे. एवढ्या भ्रष्टाचाऱ्यांना त्यांनी जवळ घेतले आहे. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हिंदूत्वाच्या प्रश्नावरून उद्धव ठाकरेंना डिवचले होते. यावर बोलताना ठाकरे म्हणाले, अमित शहा यांनी मला हिंदूत्व शिकवण्याची गरज नाही. एखाद्या राष्ट्रांत राष्ट्रगीतावरून चर्चा होते. भाजपचे 'वंदे मातरम' हे 'वन डे मातरम' आहे. कारण त्यांना याची काही पडलेली नाही. भारतात काय सुरू आहे? वंदे मातरम म्हणताना त्यांना भारत माता किती दुःखात आहे हे त्यांना दिसत नाही. अमित शहा मला जे हिंदूत्ववारून म्हणत आहेत, त्यांना मला प्रश्न विचारायचा आहे की त्यांच्या मंत्रिमंडळात गोमांस खाणारे माणसं आहेत. किरेन रिजीजू यांनी म्हटले होते की मी गोमांस खातो कोण मला आडवते. आणि त्यांच्याच सोबत अमित शहा जेवण करताना बसले आहेत. माझ्या हिंदूत्वावर बोलण्या आधी त्यांनी किरेन रिजीजू यांना मंत्रिमंडळातून काढून टाकले पाहिजे.

## मुंबई लुटणाऱ्यांनी अमित शहांवर बोलू नये : एकनाथ शिंदे



**नागपूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. "कोविड काळात मड्याच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्यांनी आणि मुंबई लुटणाऱ्यांनी अमित शहा यांच्यावर बोलणे ही मोठी शोकांतिका आहे," अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंचा समाचार घेतला. तसेच स्वत:चे पायपुसणे करून घेणाऱ्यांना दुसऱ्यावर टीका करायचा अधिकार नाही, असेही ते म्हणाले.

उद्धव ठाकरेंच्या टीकेला उत्तर देताना एकनाथ शिंदे यांनी मुंबई महानगरपालिका आणि कोविड काळातील कथित भ्रष्टाचाराचा पाढाच वाचला. शिंदे म्हणाले, "ज्यांनी अनेक वर्ष मुंबईची तिजोरी लुटली, मिठी नदीतील गाळ आणि रस्त्यातील डांबर खाल्ले, एवढेच नाही तर कोविडसारख्या महामारीत रुग्णांच्या तोंडची खिचडी आणि डेडबॉडी बॅगमध्येही पैसे खाल्ले, अशा लोकांनी दुसऱ्यांवर टीका करू नये. खोटी कोविड सेंटर्स उभी करून मड्याच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्यांचा बॅलन्स गेला असून ते आता काहीही बोलू लागले आहेत."

सध्याच्या सरकारला आणि उपमुख्यमंत्रिपदाला 'घटनाबाह्य' म्हणणाऱ्या ठाकरेंवरही शिंदेंनी निशाणा साधला. "मी मुख्यमंत्री असतानाही हे पद घटनाबाह्य असल्याचे ते म्हणायचे, आता मी उपमुख्यमंत्री आहे तर तेही त्यांना घटनाबाह्य वाटते. मुळात त्यांना बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान आणि घटनाच मान्य नाही, म्हणून ते असा टाहो फोडत असतात. उद्धव ठाकरेंच्या काळातही अजित पवार उपमुख्यमंत्री होते, मग तेव्हा ते चालले कसे? हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टातील याचिका आणि इतिहास तपासून त्यांनी बोलावे," असे खडेबोल एकनाथ शिंदेंनी सुनावले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ डिसेंबर २०२५


## महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयात उद्योजकता विकास क्लबचा शुभारंभ



**उमरगा : (प्रतिनिधी)** महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयात करिअर कट्टा उपक्रमांतर्गत उद्योजकता विकास क्लबचे उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, नवनिर्मिती आणि उद्योजकतेची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. अस्वले यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी, कौशल्य, विकास आणि नव्या रोजगार क्षेत्रांविषयी मार्गदर्शन केले. उद्योजकतेद्वारे आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी उद्योजकता विकास क्लबचा अध्यक्ष प्रसाद ममाळे यांनी उद्योजकता क्लब स्थापन्यामागची भूमिका व क्लब मधील सदस्यांनी करावयाची कार्यप्रणाली स्पष्ट केली.

क्लब मधील सदस्य - सुशील सूर्यवंशी (सदस्य), कु.रत्नावली बेरड (सदस्य), कु.निशिगंधा पाटील (सदस्य) नसरुद्दीन खान (सदस्य), प्रणव पोतदार (सदस्य), अजय इटकर (सदस्य ), कु.स्नेहा मुळे (सदस्य ),कु.आरती सोनकांबळे (सदस्य), कु. श्रुती पांचाळ (सदस्य)- या सर्वांचे प्राचार्य यांनी स्वागत करून त्यांना क्लब मध्ये करावयाची कार्य याविषयी मार्गदर्शन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. करियर कट्टाअंतर्गत दिल्ली दौऱ्यासाठी निवड झालेल्या कु. आनीषा सुरवसे हिने दिल्ली दौऱ्यात आलेले अनुभव उपस्थित विद्यार्थ्यांना सांगून ही संधी फक्त करिअर कट्ट्यामुळे मिळाली अशी भावना तिने यावेळी व्यक्त केली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे,उपप्राचार्य पद्माकर पिठले, आय. क्यू.ए.सी समन्वयक प्रा.डॉ. विनोद देवरकर, प्रा. डॉ. भरत शेळके, करियर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले प्रा. डॉ. चंद्रसेन करे तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक , इतर महाविद्यालयातील प्राध्यापक व करियर संसदेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वैष्णवी जमादार तर आभार सुशील सूर्यवंशी यांनी मानले.

## डॉ प्रभाकर शेळके यांना राज्यस्तरीय ग्रामीण नाट्य पुरस्कार



**जालना :** येथील ग्रामीण कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या "राजकारण घुसलं घरात" या दोन अंकी नाट्यलेखना करीता कराड येथील शब्दशिल्प साहित्य प्रतिष्ठान कराडचे समन्वय प्रा. डॉ सुहासकुमार बोबडे यांच्या परमपूज्य पिताश्री स्व.वामनराव बोबडे ह्यांच्या स्मृतीदिनानिमित्त 25डिसेंबर 2025 घरपोच हा पुरस्कार रोख रक्कम महावस्त्र व सन्मानचिन्ह असे स्वरूप या पुरस्कार आहे.

जालन्यातील सर्व साहित्यिक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले यात जेष्ठ समाजसेवक रमेश देहडकर, रमेश भूतेकर साहित्यिक शशिकांत पाटील, सुनील लोणकर, कैलास भाले,राम गायकवाड, राज रणधीर, मनीष पाटील, कवी सुहास पोद्दार, डॉ सुहास सदावर्ते, प्रा पंढरीनाथ सारके,डॉ यशवंत सोनुने, सय्यद शफीक, तुकाराम पवार, विठ्ठल टेपले, दशरथ बुणगे, रंगनाथ खेडकर, अनिरुध्द पावसे,कश्यपकुमार वाहुळकर,अरुण काफरे, ॲकिशोर राऊत, ॲड.विश्वनाथ गायकवाड, पुजा गायकवाड, अश्विनी फोके, केशव धांडे, श्रीकांत गायकवाड, बाबासाहेब ताठे, इ.अभिनंदन केले.

## दौलतरत्न मंडळातर्फे गटशिक्षण अधिकाऱ्यांना क्रीडा मासिक भेट




**कन्नड (कृष्णा शिंदे) :** दौलतरत्न क्रीडा मंडळातर्फे क्रीडा मासिक भेट देताना कन्नड तालुका पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी मोहम्मद सबा ह त यांना देताना दौलतरत्न क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रवीण शिंदे यावेळी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक संदीप कुलकर्णी लिपिक लीना परदेसी गणेश पाटील आदी उपस्थित होते





### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ डिसेंबर २०२५


## गीता परिवाराचा भव्य चतुर्थ दर्शक पूर्ती महोत्सव : आठ ते दहा हजार विद्यार्थी सहभागी



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** जिंतूर शहरातील मार्केट यार्ड येथे राष्ट्रसंत ललितप्रभजी यांचे भव्य प्रवचनात व विद्यार्थ्यांना जीवन कसे जगावे यासाठी मार्गदर्शन तसेच गीता परिवाराच्या चतुर्थ दर्शक पूर्ती महोत्सवानिमित्त जिंतूर शहरात एक अभूतपूर्व सांस्कृतिक – आध्यात्मिक सोहळा पार पडला. सुमारे आठ ते दहा हजार विद्यार्थ्यांच्या सहभागातून सादर झालेल्या या अनोख्या कार्यक्रमाने शहराचे सांस्कृतिक वैभव उजळून निघाले. जिंतूरमधील जवळपास सर्व शाळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांना सहभागी केले.शाळांचा व्यापक सहभागजवाहर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, बालक मंदिर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, जीजामाता विद्यालय, संचारेश्वर प्राथमिक विद्यालय, सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, ऑर्किड इंग्लिश मीडियम, पोद्दार इंग्लिश मीडियम, विद्या वॅली, लेट कांताराव चिद्रवार इंग्लिश मीडियम, बोर्डीकर कन्या विद्यालय, बोर्डीकर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, सोनी इंटरनॅशनल, मोनालिसा इंग्लिश मीडियम, ज्ञानेश्वरी प्राथमिक, एकलव्य प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, जयदुर्गा आदिवासी आश्रम शाळा, वैदिक पौरोहित्य पाठशाळा, चैत्यनयोदय गुरुकुल अशा सर्व शाळांनी विद्यार्थ्यांसह भव्य उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची अध्यात्ममय सुरुवातकार्यक्रमाची सुरुवात परमपूज्य गुरुदेव श्री गोविंदगिरीजी व्यास महाराज यांच्या ऑनलाइन आशीर्वचनांनी झाली. त्यानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' या गीताने महाराष्ट्राला वंदन करण्यात आले. तसेच वंदे मातरम गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने सर्वांनी एकत्र येत राष्ट्रवंदना केली.राधाकृष्ण-गोपी यांच्या सादरीकरणांनी कार्यक्रमाला अलौकिक रंगत आली आणि प्रांगण भक्तिमय वातावरणाने भरून गेले.एकाच वेळी आठ हजार विद्यार्थ्यांनी सादर केला गीतेचा बारावा अध्यायदुपारी नेमके दोन वाजून तीन मिनिटांनी इतिहास घडला. जिंतूरच्या विविध शाळांतील आठ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी एकाच वेळी श्रीमद् भगवद्गीतेचा बारावा अध्याय म्हणून दाखविला. हजारो आवाजात गुंजणारा हा गीतेचा अध्याय उपस्थितांना रोमांचित करणारा आणि दृष्टीस पडेल तितका अद्भुत असा अनुभव देणारा ठरला.महोत्सवाची सांगता आणि संस्कारांची ज्योतकार्यक्रमाचा समारोप परमपूज्य राष्ट्रसंत श्री ललित प्रभ महाराज यांच्या आशीर्वचनांनी झाला. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या आयोजनातून 'बालपणी दिलेले संस्कार सहज अवगत होतात' या विचाराची सुंदर प्रचिती मिळाली.कार्यक्रमाच्या यशात सर्वांचे मोलाचे योगदानहा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गीता परिवाराच्या सदस्यांनी प्रत्येक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना गीतेचा बारावा अध्याय शिकविला. सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग यांनी संपूर्ण सहकार्य केले.वेद विद्यालयाचे सर्व न्यासी, गुरुदेव श्री गोविंदगिरी जी चे साधक व शिष्य परिवार तसेच जिंतूर शहरातील नागरिकांनी व्यापक सहकार्य दाखविले. विशेषत: लोककल्याणकारी प्रवचन समिती आणि ब्रिजगोपालजी तोष्णीवाल यांचे योगदान उल्लेखनीय ठरले.जिंतूरमध्ये प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी एकत्र येत गीता अध्यायाचे सादरीकरण केल्याने हा दिवस शहराच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाणार आहे.

## गुणकारी पपई

मी आहे पपई
चव माझी गोड
प्रत्येकानी खावी
एक तरी फोड
पानापानात माझ्या
औषधी गुणधर्म
पांढऱ्या पेशी वाढविने
हेची माझे कर्म
काळ्या काळ्या बिया
पोटात माझ्या कितीतरी
सर्वांना वाटते
जणू काळी मिरी
सेवन माझे करता
वाढते प्रतिकारशक्ती
वजन कमी करण्याची
आहे सोपी युक्ती
थंडीच्या दिवसात
असते मी गुणकारी
उष्णता वाढविण्यासाठी
खातात मला सारी



- रवींद्र चालीकवार
म.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## कविते तू भेटली म्हणून

कविते तू भेटली म्हणून
सांगता आली सल
काळजात रुतलेली आरपार..

भाळावरची जखम
चिरघळली भयंकर तेव्हा
तूच लावली मलमपट्टी
आशेची हळुवार
म्हणून धरलीय खपली
जखमेने आताशा..

मनातील वादळांना
तूच दिली दिशा
अन् चालता झालो मी
नदीच्या वाहत्या पाण्याप्रमाणे
खाच खळग्यांना दूर सारत
आयुष्याच्या खडतर वाटेने
आजुबाजूचं रान हिरवं करत करत..

जेव्हा हरवला उजेड
अन् पडला अंधार भवताली
सूर्य मावळल्याने
तेव्हा तूच दिला धीर
आकाशातील चांदण्याही
प्रकाश देतात आपल्या परीने
हे दाखवून..

तू होऊन आई
ऐकून घेतलं माझं रडगाणं
अन् दिलीस सावली
या तापलेल्या शेतशिवारास..

म्हणून
माझं रडगाणं ही झालं
शब्दांनी सजलेलं
मातीत रुजलेल
सुंदर गाणं..
अन् जगण्याला अर्थ आला ..

**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**










# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ डिसेंबर २०२५


## श्रीकृष्ण महाविद्यालय सदैव आपल्या सेवेत : प्राचार्य डॉ. गुलाब राठोड



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात शिष्यवृत्ती पंधरवडा निमित्त आयोजित विद्यार्थी मेळाव्यात ते अध्यक्षपदावरून बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून हिंदी विभागप्रमुख व शिष्यवृत्ती विभागाचे नोडल अधिकारी प्रा. डॉ. बालाजी कोनाळे हे उपस्थित होते. श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटीच्या वतीने समाजकल्याण विभागाच्या सूचनेनुसार शिष्यवृत्ती पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी व्यासपीठावर शिष्यवृत्ती संदर्भात अधिक माहिती देण्यासाठी ड्रीम चेअर अकादमीचे अध्यक्ष श्री अनिल डोंगळे , संगणक विभागाचे विभागप्रमुख प्रा.आय. एस. इनामदार , प्रा . अजय कांबळे हे आवर्जून उपस्थित होते. प्राचार्य डॉ.गुलाब राठोड पुढे म्हणाले की,महाविद्यालयात सर्व कर्मचारी व अधिकारी विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत करण्यासाठी तत्पर आहेत.

मी स्वतः ग्रामीण भागातील असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अनेक अडीअडचणी सोबत आर्थिक अडचण खूप मोठी असते,याची मला पुरेपूर जाण आहे.त्यामुळे शिष्यवृत्ती ही आपल्यासाठी एक सुवर्णसंधी असून त्याचा पुरेपूर लाभ आपण घेतला पाहिजे.हे महाविद्यालय आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर आहे.दीन दलित व शेतकऱ्यांच्या मुलासाठी अशा शिष्यवृत्त्या नवसंजीवनी ठरू शकतात.

त्यामुळे थोडा आळस झटकून ,नकारात्मक भावना बाजूला सारून या शिष्यवृत्तीचे आपण लाभार्थी झाले पाहिजे, जेणे करून आपला शैक्षणिक आलेख आपल्याला अधिक उंचावत ठेवता येईल व शैक्षणिक गुणवत्ता आणखी वाढीस लागेल.आज घडीला उपलब्ध असलेल्या सर्व शिष्यवृत्तीचे जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

या पंधरवड्याचे विशेष म्हणजे भारत सरकारच्या शिष्यवृत्ती सोबतच विभिन्न कंपनीच्या वतीने सुद्धा विविध शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते, याचीही अत्यंत सखोल अशी माहिती ड्रीम चेअर कंपनीचे अध्यक्ष श्री अनिल डोंगळे यांनी विद्यार्थ्यांसमोर दिली. शिष्यवृत्ती नोडल अधिकारी प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनीही भारत सरकारच्या शिष्यवृत्तीविषयी अधिकची माहिती देऊन त्यासोबतच येणाऱ्या अनेक अडचणी संदर्भात विवेचक व विश्लेषणात्मक मार्गदर्शन केले.

प्रा.अजय कांबळे यांनी शिष्यवृत्ती संदर्भात सर्व तांत्रिक माहिती पुरविली.कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी सर्व पाहुण्यांचे यथोचित स्वागत करण्यात आले,मगच कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिष्यवृत्ती कक्षाधिकारी विलास कटकधोंड यांनी केले.

सूत्रसंचालन प्रा.आय. एस. इनामदार यांनी केले तर कार्यक्रमाचे सविस्तर आभार प्रा. कोडे यांनी मानले.या कार्यक्रमास असंख्य विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी सुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इकरा पब्लिक स्कूलमध्ये आनंद मेळावा



**जळगाव** : मोहाडी येथील इकरा शिक्षण संस्था संचलित, इकरा पब्लिक शाळेत आनंद मेळावा घेण्यात आला.आनंद मेळाव्याचे उद्घाटन शाळेचे चेअरमन अ.करीम सालार यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञाना बरोबरच, व्यावहारिक,आर्थिक बाबीची जाण व्हावी, समाजाचे ज्ञान मिळावे, बिन भिंतींच्या शाळेतील ज्ञान प्राप्त व्हावे,व्यवहार कुशलता कळावी यासाठी शाळेत आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यात एकूण ४० स्टॉल लावण्यात आले होते.आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले कचोरी, समोसा, बटाटा पोंगा, गुलाब जामून, दहिवडा, पास्ता, बटाटा भजी, इडली, पाणीपुरी, खमंग, नूडल्स, पोहे, आप्पे, पॉपकॉर्न, पोह्याचा चिवडा व ओली भेळ इत्यादी पदार्थांचा समावेश होता.मेळाव्यात विद्यार्थ्यांनी हजारो रुपयांची कमाई केली.मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे झुले,मिकी माऊस व ऊंट रायडिंगचा आनंद घेतला. मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांना दानिश अहमद,आमीर खान तसेच इतर सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.सर्व विद्यार्थ्यांनी मेळाव्यातील खाद्यपदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेतला.

मेळाव्याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे आणइ उत्साहाचे वातावरण दिसून आले.या मेळाव्यात एजाज मलिक साहेब,मजीद झकेरिया व इरफान सालार यांची उपस्थिती होती.या मेळाव्याच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी पालक व माजी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# प्रचार दोनदा आणि खर्च मात्र एकदाच

## निवडणूक आयोग निर्णय घेत नसल्याने उमेदवारांमध्ये संभ्रम

**जिंतूर (बी.डी. रामपूरकर)** : जिंतूर नगर परिषद निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर उमेदवारांनी प्रचारांच्या पहिल्याच टप्प्यात जोरदार मोहीम उभी केली मात्र अकरा वार्डातील एका उमेदवारांची निवडणूक पुढे ढकलल्याने उमेदवारांच्या नियोजनांचा चुकून भुंगावता घोळ झाला आहे. त्यामुळे उमेदवारांना प्रचारापेक्षा खर्चाची चिंता वाढली आहे.

प्रचार दोनदा खर्च एकदा अशी पंचायत उमेदवाराची झाली.जिंतूर नगरपरिषद निवडणुकीत पहिली मोहीम जोमात पार पडल्यानंतर आता दुसऱ्या फेरीसाठी जिंतूर नगरपरिषदेतील वार्ड क्रमांक 11 मधील( क) च्या उमेदवारांना पुन्हा त्याच जोमानी उतरावे लागणार आहे. पत्रके, सोशल मीडिया, कार्यालय, वाहन, रॅली पासून भेटीगाठी पर्यंत सर्वच तयारी करण्यात करावी लागणार असून पण आताही खर्च मात्र पूर्वीच्या हिशोबातच दाखवावा लागणार असल्याने उमेदवारांची झोप उडाली आहे. प्रचारात खर्च होणारा प्रत्येक रुपया नियमात बसवताना उमेदवारांना आता कसरत करावी लागत असून 'प्रचार वाढला, खर्चाचा हिशोब बदलत नाही ही मोठी अडचण उभी राहिलेली दिसते निवडणूक आयोगाकडे खर्चाची मर्यादा वाढवण्याची मागणी उमेदवारांनी केली असली तरी अद्याप कोणतीही स्पष्टता मिळालेली नाही. त्यामुळे उमेदवारांची उमेदवारांमध्ये संभ्रमांचे वातावरण आहे .खर्चाची सुधारित स्पष्टीकरण द्यावे.

राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केल्यानंतर पुन्हा स्थगितही आयोगानेच केली आहे. परंतु या कालावधीत उमेदवारांचा मोठा खर्च झालेला आहे. पुन्हा उमेदवारांना घरापर्यंत प्रचार करण्यासाठी खर्च करावा लागणार आहे. त्यामुळे आयोगाने खर्चाच्या मर्यादेचे आधारित स्पष्टीकरण जाहीर करावे. अशी मागणी उमेदवारातून होत आहे.

उमेदवाराच्या खर्चाबाबत आम्ही निवडणूक विभागांच्या अधिकाऱ्याकडून माहिती मागवली. मात्र त्यांच्याकडे निवडणूक आयोगाची सुधारित माहिती आली नसल्याचे उत्तर मिळते. त्यामुळे आम्ही उमेदवार खर्चाबाबत संभ्रमात आहोत.

**मुन्नाभाऊ गोरे**

भाजपा उमेदवार निवडणुकीतील उमेदवाराच्या खर्चाच्या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाकडे मार्गदर्शन मागवले आहे. त्यांच्याकडून अद्याप खर्चाबाबत अधिकृत माहिती आली नाही. राज्य निवडणूक आयोगाकडून माहिती आल्यानंतर उमेदवारांना कळविण्यात येईल.

**निवडणूक अधिकारी**
**निवडणूक विभाग जिंतूर .**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ डिसेंबर २०२५

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात दोन दिवसीय "लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (POSH) जनजागृती कार्यशाळा" संपन्न





**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्षाच्या वतीने मानवी हक्क दिनानिमित्त लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (POSH) या विषयावर दोन दिवसीय जनजागृती कार्यशाळेचे आयोजन दिनांक १० आणि ११ डिसेंबर रोजी करण्यात आले. कशाच्या दृष्टीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते.कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी POSH कायद्याविषयी महत्त्वपूर्ण माहिती विद्यार्थिनींसमोर मांडली. त्यांनी स्पष्ट केले की लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा २०१३ हा कायदा कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित, आदरयुक्त आणि भेदभावमुक्त वातावरण मिळावे या उद्देशाने लागू करण्यात आला आहे.पुढे बोलताना डॉ. अस्वले म्हणाले की या कायद्यानुसार प्रत्येक संस्थेत तक्रार समिती असणे बंधनकारक आहे. तसेच तक्रार दाखल झाल्यानंतर ९० दिवसांत चौकशी पूर्ण करणे हे कायद्याचे निर्देश आहेत. विद्यार्थिनींनी कोणताही प्रसंग घडल्यास निर्भयपणे तक्रार करावी, असा आत्मविश्वास निर्माण करणे ही शिक्षण संस्थांची जबाबदारी असल्याचेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.यावेळी विद्यार्थिनींकडून लैंगिक संवेदनशीलता विषयी प्रतिज्ञा घेण्यात आली.महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. बालिका गायकवाड आणि डॉ. आशा शिंदे यांनी विशाखा समितीची मार्गदर्शक तत्त्वे, तक्रारपेटी समिती, महिला, विद्यार्थिनींना भेडसावणारे मानसिक व सामाजिक प्रश्न या विषयांवर मार्गदर्शन केले.या प्रसंगी महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयिका प्रा. रेश्मा नितनवरे, डॉ. मनोरंजना निर्मळे, डॉ. पार्वती सावंत, प्रा. आरती जाधव, प्रा. सपना राठोड, प्रा. मयुरी माडजे तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितनवरे आर. आर. यांनी केले. प्रास्ताविक डॉ. पार्वती सावंत तर आभारप्रदर्शन डॉ. मनोरंजना निर्मळे यांनी केले.महाविद्यालयातील या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये कायदेशीर जागरूकता, सुरक्षितता आणि आत्मविश्वास वाढण्यास मोठी मदत होईल असे मत विद्यार्थिनींकडून व्यक्त करण्यात आले.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला व्हॉलीबॉल मध्ये सुवर्ण पदक



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** दिनांक. ११ डिसेंबर २०२५ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील बीएससी, एनसीसी प्रथम वर्गात शिकत असलेल्या हर्षवर्धन कदेरे चा सत्कार करण्यात आला . त्याची डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या व्हॉलीबॉल संघात निवड झाली होती.

३७ व्या महाराष्ट्र आंतर विद्यापीठ महोत्सव २०२५ पार पडल्या या स्पर्धा स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे दि .४ ते ८ डिसेंबर २०२५ रोजी या कालावधी मध्ये संपन्न झाल्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील एकुण २५ व्हॉलीबॉल विद्यापीठ संघानी सहभाग घेतला होता या स्पर्धेत डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संघानी प्रथम क्रमांक मिळवुन सुवर्ण पदक प्राप्त केले . या बदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा अश्लेष भैया मोरे यांनी सुवर्ण पदक देऊन सत्कार केला या प्रसंगी शुभेच्छा देत असताना अश्लेष मोरेंनी हषवर्धन नी येथेच न थांबता राष्ट्रीय स्तरावर सुद्धा त्यांनी व्हॉलीबॉल संघात सहभाग घ्यावा व स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून चांगला कर्तव्यदक्ष अधिकारी बनुन समाजाची सेवा करावी असे आव्हान केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले,डॉ पदमाकर पिटले खेळ विषयाचे विभाग प्रमुख प्रा विजय पवार, डॉ राजू सूर्यवंशी, कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, प्रा शेखर दाडगे, नितीन कोराळे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## तुगांव येथे संपन्न होणाऱ्या "दहाव्या धम्म परिषदेसाठी" अध्यक्ष, स्वागताध्यक्ष, खजिनदारासह नूतन कार्यकारिणी जाहीर....

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील तुगाव येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दि.25 डिसेंबर रोजी दहाव्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.गेल्या नऊ वर्षापासून तुगाव येथे यशस्वीपणे अखिल भारतीय धम्म परिषदेचे आयोजन केले जाते.नियोजित धम्म परिषदेच्या नियोजन आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने शनिवार दि.०६/१२/२०२५रोजी सायं. ६:00 वाजता त्रिरत्न बुध्द विहार येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला तुगावमधील सर्व नागरिक ,बंधू भगिनी,उपासक, उपासिका आणि मागील कार्यकारिणीतील सर्व सदस्य यांच्या सोबतच गावातील नागरिक ,समता सैनिक दलाचे पदाधिकारी ,महिला मोठ्या संख्येनी उपस्थित होत्या.धम्म परिषदे बाबत कांही नवीन संकल्पना आणि सूचना संदर्भात चर्चा विनिमय करून यावर्षीच्या नुतन कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.अध्यक्षपदादाठी महेंद्र कांबळे यांनी शाहूराज भोसले यांचे नाव सुचवले.तर खजिनदार पदासाठी राजकुमार कांबळे यांनी नंदकुमार विठ्ठल गायकवाड यांचे नांव सुचवले ,स्वागताध्यक्ष पदासाठी देविदास आबा कांबळे यांनी भालचंद्र लोखंडे यांचे नाव सुचवले.त्याला सर्वांनी अनुमोदन देऊन सहमती दर्शवली.प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे उपस्थित महिलांच्या हस्ते पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.लागलीच सामूहिक बुध्द वंदना झाली त्यानंतर मा.प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी प्रास्ताविकात आतापर्यंतच्या धम्म परिषदा,त्यामागील उद्देश व होणाऱ्या धम्म परिषदेसंदर्भात सविस्तर विवेचन केले.यावेळी प्रमुख उपस्थितीत सौ.रेखाताई सुधाकर गायकवाड,संगीता नंदू गायकवाड,सौ.पार्वती गायकवाड,सौ.इंदुबाई भालेराव,अश्विनी नागटिळे ,सौ.मंगल श्रवण कांबळे,जितेंद्र कांबळे,जितेंद्र लोखंडे, मा.बलभीम गायकवाड,सचिन बनसोडे,संकल्प कांबळे, मा.भालचंद्र लोखंडे आवर्जून उपस्थित होते.गेली आठ वर्षे तुगाव येथील ग्रामस्थ अतिशय रचनात्मक पद्धतीने तुगाव आणि पंचक्रोशीत धम्माचा सुमंगल विचार मनोमन रुजविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. यावेळी धम्मा संदर्भात अनेकांनी आपली मनोगते व्यक्त करून आपल्या आचरणातून धम्माची व्याप्ती अधिकाधिक वाढविण्याचा दृढ निश्चय केला.अनेकांनी वेगवेगळ्या सूचना केल्या,त्याचे स्वागत करण्यात आले.त्यामुळेच याही वर्षी ही यशस्वी परंपरा दृगोचर करण्यासाठी नूतन पदाधिकारी व नवीन कर्यकरणीची निवड करण्यात आली त्यात अध्यक्ष म्हणून शाहूराज भोसले ,स्वागताध्यक्ष म्हणून भालचंद्र लोखंडे, तर खजिनदार म्हणून मा.नंदकुमार गायकवाड यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले.शेवटी "आपण धम्म परिषदेच्या या उपक्रमशील कार्यरथाला सतत प्रोत्साहन देत अलात यापुढेही असेच सहकार्य करावे आणि तरुण युवकांसाठी वाचनालय स्थापन करून वाचनसंस्कृती वाढवावी अशी विनंती सचिन बनसोडे व उपस्थितांनी केली आणि सर्व नूतन कार्यकारिणी त्यावर निश्चितपणे काम करेल असे आश्वासन देऊन उपस्थितांचे आभार मानले.बैठकीचे सूत्रसंचालन धर्मेंद्र कांबळे आणि राजकुमार कांबळे यांनी केले.राष्ट्रगितानंतर बैठकीची सांगता झाली.नूतन कार्यकारिणी....मा.भालचंद्र लोखंडे,स्वागताध्यक्ष.मा.शाहूराज भोसले,अध्यक्षमा.नंदकुमार गायकवाड,खजिनदार.इतर कार्यकारणीतील सदस्य खालीलप्रमाणेमा.सचिन बनसोडे,मा.राजकुमार कांबळे,मा.संकल्प कांबळे,मा.छाया बगाडे,मा.बलभीम गायकवाड,मा.धर्मेंद्र कांबळे,मा.सचिन कांबळे,मा. सागर भोसले,मा.गोपाळ सुरवसे,मा.सुदर्शन कांबळे,मा.अमृत कांबळे,मा.विद्याचंद्र कांबळे,मा.नीलकंठ (जॉन)कांबळे,मा.दत्ताभाऊ कांबळे,मा.धर्मा बनसोडे,मा.विशाल कांबळे,मा.लोकेश कांबळे,मा.आकाश कांबळे,मा.सूरज गायकवाड,मा.सुधाकर गायकवाड,मा.शिवाजी कांबळे,मा.दिगंबर कांबळे,मा.कान्हा जाधव,मा.अजय कांबळे,मा.बाळू गायकवाड,मा.भुजंग कांबळे,मा.विलास गायकवाड,मा.राज गायकवाड,मा.ऋतिकभैया बनसोडे,मा.धर्मेंद्र कांबळे,मा.सुमित गायकवाड,

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ डिसेंबर २०२५

# मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय स्थगीत का नाही ? अभ्यासक राजेंद्र दाते पाटील



**नवी दिल्ली:** पाँडेचरीराज्यातील एका मुलीला तिच्या आईच्या जातीच्या आधारे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.हा निर्णयऐतिहासिक मानला जात आहे. जात निश्चित करताना वडिलांची जातच निर्णायक घटक ठरते या पूर्वी दिलेल्या निर्णयाचे काय? किंवा मराठा व कुणबी विवाह आंतर जातीय मानायचा काय? किंवा न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालय खंडपीठाने या प्रकरणात मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगित ठेवले नाही आणि मुलीला तिच्या आईच्या अनुसूचित जातीच्या आधारे जात प्रमाणपत्र जारी करण्याची परवानगी दिली हे का बरे झाले?अशी महत्वाची बाब अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी बोलुन दाखवली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जायमाल्या बागचीयांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.हा निर्णय मराठा समाजाला एकत्रित रित्या लागु होईल काय? या बाबत आरक्षण कायद्याचे आणि घटनात्मक तरतुदीचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे सोबत आमच्याप्रतिनिधीने विशेष बातचीत केली आहे.पाँडेचेरीतील एका मुलीलातिच्या आईच्या आदि द्रविड जातीच्या आधारे अनुसूचित जातीचे प्रमाण पत्र देण्यास परवानगी दिली आहे.एस सी प्रमाण पत्र देताना वडिलांची जात आणि त्यांचा पत्ता हा प्राथमिक आधार मानला जातो.या अनुषंगाने ही बातचीत महत्वपूर्ण ठरणार आहे.आईच्या जातीवरून मुलीला मिळणार जात प्रमाणपत्र सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय झाल्याची चर्चा सगळी कडेच सुरू असुन सुप्रीम कोर्टाने जात प्रमाण पत्राबाबत एक अतिशय महत्त्वाचा निर्णय दिला आहे.अल्पवयीन मुलीच्या शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने एका दुर्मिळ निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तिच्या आईच्या ' आदि द्रविड' जातीच्या आधारे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र जारी करण्यास मान्यता दिली. या बाबत आमच्या प्रतिनिधीने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना आपले कायदेशीर मत काय आहे ? असे विचारल्यावर ते म्हणाले की,या प्रकारणात वडील अनुसुचित जातीचे नसतानाही आईच्या जातीचा आधार घेऊन मुलीला एससी प्रमाणपत्र देण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत.पुद्दुचेरीतील मुलीला अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र देण्याचे निर्देश देणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देण्यास सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने नकार दिला.या प्रकरणात आईने तहसीलदारांना तिच्या दोन मुली आणि एक मुलाला अनुसूचित जातीचे प्रमाण पत्र देण्याची विनंती केली होती कारण तिचा पती लग्ना पासून तिच्या पालकांच्या घरी राहत होता हे कारण कायदेशीर तराजूत तपासणे गरजेचे ठरणार असुन या बाबत पुढे ते म्हणाले की,या प्रकारणां तील अर्जदार आईने आपल्या याचिकेत तिचे पालक आणि आजी आजोबा हिंदू आदिद्रविड समुदायाचे असल्याचा युक्तिवाद केला होता.सुप्रीम कोर्टाने अल्पवयीन मुलीच्या शिक्षणाला मदत व्हावी या उद्देशाने तिला आईच्या जातीच्या आधारे एससी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय दिला आहे. कोर्टाने आई ‘ आदि द्रविड’ जातीची असून पती एससी प्रवर्गातील नसतानाही, मुलीला आईच्या जातीच्या आधारे एससी प्रमाणपत्र देण्यास मंजुरी दिली असुन घटना पीठने दिलेल्या माधुरी पाटील प्रकारणां तील निर्देशांचे काय? असा प्रश्न आता देशभरात पुढे येणार असल्याचे मत आमच्या प्रतिनिधीने जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांना आपले कायदेशीर मत व्यक्त करतांना नमुद केले.पुढे बोलतांना ते म्हणाले की,हा निर्णय देताना खंडपीठाने स्पष्ट केले की" आम्ही कायद्याचा प्रश्न खुला ठेवत आहोत," तसेच "बदलत्या काळा नुसार आईच्या जातीच्या आधारे जात प्रमाणपत्र का जारी केले जाऊ नये ? " असा सवाल देखील न्यायालयाने उपस्थित केला. सरन्यायाधीशांच्या या विधानामुळे मोठ्या प्रमाणात वादविवाद निर्माण होण्याची शक्यता देखील जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केली असुन विशेष म्हणजे, मुलाचा वारसा हा वडिलांच्या जातीवरूनच ठरतो या नियमाला आव्हान देणाऱ्या अनेक याचिकां वरील सुनावणी अद्याप सुरू आहे. अशावेळी कोर्टाचा हा निर्णय आल्याने आगामी काळात त्याचे मोठ्या प्रमाणात परिणाम उमटण्याची स्थिती निर्माण झाली आहे. सरन्यायाधीशांच्या या वक्तव्याचा अर्थ अनुसूचित जातीच्या महिलेच्या उच्च जातीच्या पुरुषाशी झालेल्या लग्नातून जन्मलेल्या आणि उच्च जातीच्या कुटुंबात वाढलेल्या मुलांना देखील अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अधिकार असेल, असा लावला जाण्याची शक्यता आहे म्हणुन यात ओबीसी वर्ग किंवा कुणबी वर्गास घेताना अनेक कायदेशीर व घटनात्मक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे आणि मोठ्या प्रमाणात वादविवाद निर्माण होण्याची शक्यता देखील जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केली यातील जुने निर्णय तपासता येतील काय? यावर जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, वडीलांच्या जातीच्या आधारे मिळते जातप्रमाण पत्र 5 मार्च 1964 आणि 17 फेब्रुवारी 2002 च्या राष्ट्रपती अधिसूचना आणि गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार,एखाद्या व्यक्तीस जात प्रमाणपत्र देताना प्रामुख्याने वडिलांची जात आणि त्यांचे निवासस्थान यांचा विचार केला जातो. जात प्रमाणपत्र मिळविण्या साठी एखाद्या व्यक्तीची पात्रता प्रामुख्याने त्यांच्या वडिलांच्या जातीवर तसेच राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या अधिकार क्षेत्रा तील त्यांच्या निवासी स्थितीवर आधारितअसते. या वर काही न्याय निवाडे आहेत काय? असे विचार ल्यावर ते म्हणाले की, पुनित राय विरुद्ध दिनेश चौधरी (2003) या आरक्षणाशी संबंधित खटल्यात सुप्रीम कोर्टाने म्हटले होते की," जात निश्चित करताना वडिलांची जातच निर्णायक घटक ठरते, " कारण पारंपरिक हिंदू कायद्यानुसार मुलांना जात वडिलांकडून मिळते. आंतरजातीय विवाहातील अपवाद (2012 चा महत्त्वाचा निर्णय)रमेशभाई डाह्या विरुद्ध गुजरात सरकार 2012) या खटल्याचा निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले होते की,आंतर जातीय विवाहात किंवा आदिवासी-बिगर आदिवासी विवाहात वडिलांच्या जातीची पूर्वधारणा असली,तरी ती अंतिम नसते.मुलगा किंवा मुलगी हे पुरावे दाखवू शकतात की त्यांचे संगोपन आईने तिच्या समुदायात केले वडील उच्चवर्णीय असले,तरी मुलाला उच्चवर्णीय असल्याचा लाभ आयुष्यात मिळाला नाही आणि तो किंवा ती आई च्या समुदाया सारखेच वंचितपण,अपमान आणि अडचणी सोसत वाढला असेल, तर त्याला किंवा तिला आईच्या जातीचा लाभ मिळू शकतो. या न्याय निवाड्यात जे नमुद केले त्याचा मराठा समाजाला कसा फायदा होईल? कारण मराठा व कुणबी एकच आहेत या संकल्पनेस व मराठा व कुणबी हे सजातीय असल्या करणाने हा निर्णय कसा लागु करता येईल असा घटनात्मक व कायदेशीर निर्माण होणारा सवाल त्यांच्या बोलण्या तून पुढे आलेला आहे.आणि या निर्णयात तर असेही म्हटले होते की,त्याला समुदायानेच नव्हे तर समुदया बाहेरील लोकांकडून देखील कायम त्या समुदायाचा सदस्य म्हणून वागवले गेले असेल,ज्या समुदायाची तिची आई आहे, तेव्हा ही बाब अधिक महत्त्वाची ठरणार असुन प्रत्यक्षात न्याय निवड्यात नमुद केलेल्या बाबी तपासल्या नंतरच या निकालाची अंतिम स्पष्टता पुढे येईल असे ही जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले असुन, तरी या न्याय निवाड्याचा फायदा किंवा तोटा व अधिक दुर दृष्टी ठेऊन करावा लागेल असे ही जेष्ठअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट केले आहे. (उर्वरित पुढील भागात)

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ डिसेंबर २०२५

# सर्वांसाठी आरोग्य : सामाजिक न्याय आणि मानवकल्याणाचा मार्ग

आंतरराष्ट्रीय सार्वत्रिक आरोग्य संरक्षण दिन दरवर्षी 12 डिसेंबर रोजी संपूर्ण जगभर साजरा केला जातो. आरोग्य हा मानवाधिकार आहे, कोणत्याही समाजातील आर्थिक-सामाजिक परिस्थिती, सांस्कृतिक पार्श्वभूमी किंवा राजकीय संरचना काहीही असो, प्रत्येक मनुष्याला आरोग्यसेवा मिळणे हे केवळ त्याचे मूलभूत अधिकार नसून त्या समाजाच्या सभ्यतेचे, प्रगतिचे आणि माणुसकीच्या मूल्यांचे महत्त्वाचे मोजमाप आहे. आजच्या 21व्या शतकातील वेगाने बदलणाऱ्या जगामध्ये आरोग्यसेवा हे केवळ उपचाराचे क्षेत्र राहिलेले नाही, तर ते सामाजिक न्याय, समानता, आर्थिक प्रगती, स्त्री-पुरुष समता, सामाजिक सुरक्षितता, मानवाधिकार आणि एकूण जीवनमान यांचे केंद्रबिंदू बनले आहे. जगभरातील सरकारे, धोरणकर्ते, आरोग्य तज्ञ, समाजशास्त्रज्ञ, आंतरराष्ट्रीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था या सर्वांनी अनुभवलेले हे वास्तव आहे की, समाजाच्या विकासाचा मार्ग आरोग्याच्या पायावर उभा असतो. म्हणूनच 'सर्वांसाठी आरोग्य' ही कल्पना केवळ एखादा उद्देश नसून मानवकल्याणाचा मूलभूत पाया आहे. सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाची संकल्पना म्हणजे कोणत्याही व्यक्तीला आरोग्यसेवेची उपलब्धता आर्थिक अडचणींच्या भीतीशिवाय, भेदभावाशिवाय, समान संधींनी आणि उच्च गुणवत्तेत मिळणे होय. आरोग्यसेवेचा खर्च कुटुंबाला आर्थिक संकटात ढकलणार नाही, सामान्य माणूस उपचारासाठी कर्जबाजारी होणार नाही, ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना शहरातील लोकांच्या बरोबरीने आरोग्यसेवा मिळेल, स्त्री-पुरुष, आदिवासी, दलित, अल्पसंख्याक, स्थलांतरित, दिव्यांग, वृद्ध, बालक, गर्भवती, माता या सर्व सामाजिक घटकांना समानतेने आणि सन्मानाने आरोग्यसेवा मिळेल, हीच सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाची सार्थ संकल्पना आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आरोग्य हे केवळ आजाराची अनुपस्थिती नसून शरीर, मन आणि समाज यांमधील संतुलन आहे. समाजाचे आरोग्य हे सामाजिक रचना, आर्थिक विषमता, शिक्षण, पोषण, रोजगार, पाणी, स्वच्छता, पर्यावरण, सांस्कृतिक समज आणि राज्यव्यवस्था यांच्या गुणवत्तेशी थेट जोडलेले आहे. म्हणूनच सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाचा विचार हा 'वैद्यकीय मॉडेल' पुरता मर्यादित नसून 'सोशल मॉडेल ऑफ हेल्थ' या विस्तृत चौकटीवर आधारित आहे. आरोग्याला सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहणे म्हणजे आरोग्यसेवेतील विषमता ही सामाजिक विषमता असल्याचे मान्य करणे होय. ज्या समाजात आरोग्य विषमता मोठी, तिथे सामाजिक विषमता घनदाट असते हे समाजशास्त्राचे मूलभूत तत्त्व आहे. म्हणूनच 12 डिसेंबर हा दिवस आपल्याला केवळ आरोग्याच्या तांत्रिक बाजूची नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित असलेल्या सामाजिक प्रश्नांचीही आठवण करून देतो.जागतिक स्तरावर पाहता, गरीब व श्रीमंत देशांतील आरोग्य सुविधांमधील दरी चिंताजनक आहे. काही देशांमध्ये उच्च दर्जाची वैद्यकीय तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, डॉक्टर, संशोधन, औषधे यांच्या उपलब्धतेमुळे नागरिकांचे आरोग्य सुरक्षित असते; तर दुसऱ्या बाजूला अनेक देशांमध्ये लोकांना प्राथमिक आरोग्यसेवेसाठीही संघर्ष करावा लागतो. आफ्रिका आणि दक्षिण आशियातील अनेक देशांमध्ये आजही माता-मृत्यूदर, बाल-मृत्यूदर, कुपोषण, संसर्गजन्य आजार, अपुरी लसीकरण सेवा, मानसिक आरोग्याविषयीची भीती, गैरसमज आणि कमी गुंतवणूक यामुळे आरोग्यसेवा असमान आहे. यामुळे सामाजिक असमतोल वाढतो, गरीबी वाढते आणि लोकसंख्येचा मोठा भाग आर्थिकदृष्ट्या मागे राहतो. सार्वत्रिक आरोग्य संरक्षण हा या असमानतेला कमी करणारा व्यापक उपाय आहे. 'कोणालाही मागे न ठेवणे' ही संयुक्त राष्ट्रांची शाश्वत विकास ध्येयांची (SDGs) मुख्य संकल्पना सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाच्या माध्यमातूनच साकार होऊ शकते. सामाजिक विज्ञान असे सांगते की समाजातील कोणतीही सेवा सार्वत्रिक केली तर समाजातील दुर्बल घटकांना सर्वाधिक लाभ होतो, कारण ते पूर्वीपासूनच वंचित असतात. म्हणून सार्वत्रिक आरोग्य संरक्षण म्हणजे सामाजिक न्यायाचा सर्वात प्रभावी मार्ग होय.भारताच्या संदर्भात पाहता, आरोग्यसेवेची आव्हाने अनेक आहेत पण संधीही तितक्याच मोठ्या आहेत. भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशात आरोग्यसेवा ही सर्वात मोठी सामाजिक गुंतवणूक आहे. गेल्या काही दशकांत भारताने बाल-मृत्यूदर, माता-मृत्यूदर, लसीकरण, संसर्गजन्य रोगांवरील नियंत्रण, आयुर्मानातील वाढ, ग्रामीण आरोग्य सेवा, डिजिटल आरोग्य नोंदी, टेलिमेडिसिन, आयुष्मान भारत योजना, जनऔषधी योजना आदी क्षेत्रांत महत्वपूर्ण प्रगती केली आहे. तरीसुद्धा ग्रामीण-शहरी दरी, खाजगी-सरकारी आरोग्य क्षेत्रातील असमानता, आर्थिक बोजा, वैद्यकीय शिक्षणातील तफावत, सार्वजनिक आरोग्यावरील कमी खर्च, मानसिक आरोग्याविषयी जागरूकतेचा अभाव, पोषणाच्या समस्या, समाजातील आरोग्याबाबतचे गैरसमज, तसेच सामाजिक स्तरांमध्ये असलेली दीर्घकालीन विषमता अजूनही गंभीर मुद्दे आहेत. भारतातील बहुसंख्य कुटुंबे आजही आरोग्यसेवेवर मोठा खर्च स्वतःच्या खिशातून करतात आणि अनेकदा हा खर्च कुटुंबांना दरिद्री करतो. कर्ज काढणे, सोनं गहाण ठेवणे, शेती विकणे, मुलांच्या शिक्षणात कपात करणे हे वास्तव आजही मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. समाजशास्त्रज्ञ या परिस्थितीला 'मेडिकल पावर्टी ट्रॅप' म्हणतात. लोक आजारी पडतात म्हणून गरीब होतात आणि गरीब असल्यामुळे आरोग्यसेवा मिळवू शकत नाहीत हे दुष्टचक्र तुटण्यासाठी सार्वत्रिक आरोग्य संरक्षण अत्यावश्यक आहे.समाजातील प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य हे समाजाच्या आरोग्याशी जोडलेले असते. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पाहिले तर एखादा आजार एका कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही; तर तो समुदायात, गावात, शहरात, देशात आणि नंतर संपूर्ण जगात पसरू शकतो. कोविड-१९ महामारीने हे सत्य जगाला पुन्हा अधोरेखित करून दाखवले आहे. महामारीने देशांची आर्थिक प्रगती ठप्प केली, शिक्षण व्यवस्था विस्कळीत केली, लाखो लोक रोजगार गमावून बसले, मनोआरोग्यावर मोठा परिणाम झाला, आरोग्यसेवांची तफावत स्पष्ट दिसू लागली, श्रीमंत-गरीब दरी आणखी वाढली आणि सामाजिक सुरक्षिततेचे महत्त्व समोर आले. यामुळे सार्वत्रिक आरोग्य संरक्षण ही संकल्पना जागतिक पातळीवर एका अत्यावश्यक मानवी अधिकारासारखी स्थापित झाली. समाजशास्त्रज्ञ सांगतात की संकटाच्या काळात समाजातील कमकुवत दुवे सर्वप्रथम तुटतात आणि म्हणूनच आरोग्य क्षेत्रातील मजबुती अत्यावश्यक ठरते.आरोग्यसेवेतील सामाजिक अडथळ्यांचा विचार केला तर जात, वर्ग, लिंग, ग्रामीणता, गरीबी, शिक्षणाचा अभाव, सांस्कृतिक धारणा, अंधश्रद्धा, भाषिक अडथळे, परंपरा आणि सामाजिक भूमिकांचे विभाजन या सर्व घटकांचा मोठा प्रभाव आरोग्यसेवेच्या उपलब्धतेवर पडतो. उदा. महिलांना आरोग्यसेवा मिळण्यात अनेक अडथळे असतात, घरगुती कामांचा भार, आर्थिक अवलंबित्व, लाज-लज्जा, पितृसत्ताक विचारसरणी, पुरुषप्रधान निर्णयप्रक्रिया, वाहतुकीचा अभाव, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरची अपुरी काळजी, महिलांच्या आरोग्याकडे समाजाचे कमी दुर्लक्ष या सर्व कारणांमुळे महिलांचे आरोग्य मागे पडते. आदिवासी आणि दलित समाजातील लोकांना आरोग्य केंद्रांपर्यंत पोहोचण्यासाठी भौगोलिक, भाषिक, सामाजिक आणि आर्थिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. शहरी झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना स्वच्छ पाणी, स्वच्छता व्यवस्था, पोषण, शिक्षण आणि आरोग्य सुविधा मिळण्यामध्ये प्रचंड तफावत दिसून येते. मानसिक आरोग्याच्या संदर्भात समाजातील भीती, गैरसमज, कलंक आणि उदासीनता यामुळे लोक उपचारापासून दूर राहतात. समाजशास्त्रीय दृष्टीकोन स्पष्टपणे सांगतो की आरोग्यसेवेतील असमानता ही सामाजिक शक्तींचे, सत्ता-संबंधांचे आणि संसाधनांच्या असमान वाटपाचे द्योतक आहे. म्हणून आरोग्यसेवा सुधारण्यासाठी सामाजिक संरचना सुधारावी लागते आणि हा बदल सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाच्या माध्यमातून साध्य होतो.आरोग्य क्षेत्रातील सुधारणा ही केवळ सरकारची जबाबदारी नाही; ती संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. शाश्वत सार्वजनिक आरोग्य व्यवस्था उभी करायची असेल, तर आरोग्यसेवा, शिक्षण, पोषण, स्वच्छता, रोजगार, पर्यावरण, सामाजिक सुरक्षा आणि स्थानिक शासन हे सर्व घटक एकमेकांशी जोडले गेले पाहिजेत. समाजशास्त्रात याला 'इंटरसेक्शर्नालिटी ऑफ हेल्थ' असे म्हटले जाते. एका व्यक्तीच्या आरोग्यावर अनेक स्तरांवरील घटकांचा प्रभाव असतो आणि म्हणूनच सार्वत्रिक आरोग्य संरक्षण ही सर्वसमावेशक धोरणात्मक चौकट आहे. यामध्ये सरकारी गुंतवणूक वाढवणे, सार्वजनिक आरोग्य केंद्रांची मजबुती, डॉक्टर-नर्सांचा योग्य प्रमाणात पुरवठा, औषधांची उपलब्धता, आपत्कालीन सेवा, प्रतिबंधात्मक आरोग्य उपाय, पोषण कार्यक्रम, स्वास्थ्य शिक्षण, डिजिटल आरोग्याची सुधारणा, रोड नेटवर्क, रुग्णवाहिका सेवा, मानसिक आरोग्य सुधारणा, सामाजिक सुरक्षा योजना, महिला-सशक्तीकरण आणि आरोग्यावर केंद्रित संशोधन यांचा समावेश होतो.तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आरोग्यसेवा अधिक लोकांपर्यंत पोहोचण्याची मोठी क्षमता निर्माण झाली आहे. टेलिमेडिसिन, ई-हेल्थ रेकॉर्ड्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, मोबाईल हेल्थ अॅप्स, डिजिटल आरोग्य नोंदी, ऑनलाइन सल्लामसलत, आरोग्यविषयक माहितीचा प्रसार या सर्व माध्यमांनी ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांसाठी आरोग्यसेवा अधिक सुलभ केली आहे. परंतु डिजिटल दरीही एक सामाजिक वास्तव आहे. समाजातील आर्थिक विषमता डिजिटल साधनांच्या वापरावर परिणाम करते. म्हणून डिजिटल आरोग्य उपाय हे 'सार्वत्रिक आरोग्य' या चौकटीत बसवणे आवश्यक आहे.सार्वत्रिक आरोग्य संरक्षण दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नसून सामूहिक संकल्पाचा दिवस आहे. हा दिवस मानवाधिकारांची, सामाजिक न्यायाची, समानतेची, सर्वसमावेशक विकासाची आणि माणुसकीच्या मूल्यांची आठवण करून देतो. आरोग्यदायी समाजच प्रगत समाज असतो. आर्थिक विकासाचा पाया आरोग्य असतो. शिक्षण, रोजगार, उत्पादन, अर्थव्यवस्था, सामाजिक स्थैर्य या सर्वांवर आरोग्याचा थेट परिणाम असतो. म्हणून आरोग्यसेवा ही 'खर्च' नसून 'गुंतवणूक' आहे. ज्या देशांनी आरोग्य क्षेत्रात व्यापक गुंतवणूक केली, ते देश अधिक स्थिर, सक्षम आणि समृद्ध झाले आहेत. सार्वत्रिक आरोग्य संरक्षण ही भविष्यातील पिढ्यांसाठी सर्वात मोठी देणगी आहे. या दिनानिमित्त आपण सर्वांनी असा विचार करणे आवश्यक आहे की समाजातील प्रत्येक व्यक्तीला समानतेने, सन्मानाने आणि सुरक्षिततेने आरोग्यसेवा मिळावी. आरोग्य ही विशेषाधिकाराची गोष्ट नसून समान अधिकार आहे आणि तो अधिकार सर्वांना मिळाला पाहिजे. म्हणूनच 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना फक्त घोषवाक्य न राहता जीवनाचा मूलभूत मार्ग बनायला हवी. जेव्हा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचेल, तेव्हा खऱ्या अर्थाने समाज आरोग्यपूर्ण, न्यायपूर्ण आणि मानवतावादी बनेल. सार्वत्रिक आरोग्य संरक्षणाच्या माध्यमातून आपण अशीच एक निरोगी, समृद्ध, समतामूलक आणि न्यायप्रेमी जगाची निर्मिती करू शकतो, आणि हीच 12 डिसेंबरच्या या दिवसाची खरी प्रेरणा आहे.



. राजेंद्र बगाटे
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. क्र. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ डिसेंबर २०२५

# मुरूम चे सुपुत्र वैभव विजयकुमार वैद्य नागपुर उपनगरी चे अधीक्षक



मुरूम चे सुपुत्र वैभव विजयकुमार वैद्य याना महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग नागपुर उपनगरी चे अधीक्षक या पद वार पदोन्नती झाली आधी ते ठाणे उपअधीक्षक म्हणून ठाणे येथे कार्यरत होते . सर्व मुरूमकर व वैद्य परिवार तरफे त्यांचे सत्कार व शुभेच्छा देण्यात आल्या तसेच त्यांच्या लहान भावाने आपल्या मोठ्या बंधुचे कौतुक आपल्या शब्दांत मांडले आहे.प्रत्येक व्यक्तीचा जन्म हा केवळ शारीरिक घटनेपुरता मर्यादित नसतो, तर तो एका नव्या युगाच्या प्रारंभाची नांदी असतो. काही जन्म असे असतात, ज्यांचा प्रभाव केवळ कुटुंबापुरता सीमित न राहता समाजावर, संस्कृतीवर आणि इतिहासावरही पडतो. अशाच एका असामान्य जन्माची कहाणी आहे. दादाचा जन्म हा साध्या परिस्थितीत झाला नाही; त्याच्याशी एक विलक्षण ऊर्जा आणि आध्यात्मिक तेज जोडलेले होते. तो जन्म म्हणजे केवळ एका व्यक्तीचा नव्हता, तर तो एक विचार होता, एक प्रेरणा होती, आणि भविष्यात एका महान कार्याची बीजे रोवणारा क्षण होता. त्या दिवशी निसर्गही जणू काही एका दैवी क्षणाच्या स्वागतासाठी सज्ज झाला होता. सूर्य आपल्या तेजाने साक्ष देत होता, आणि सोसाट्याचा वारा एखाद्या घोषणेप्रमाणे जगाला काहीतरी सांगू पाहत होता. कुटुंबातील वृद्धांना आणि जाणत्यांना त्या क्षणी काहीतरी विलक्षण घडत असल्याची जाणीव होत होती. दादाच्या आगमनाने घरातील वातावरणच बदलले. त्याच्या चेहऱ्यावर असलेल्या तेजस्वी भावनेने आई-वडिलांना वेगळ्याच आनंदाची अनुभूती दिली. जणू काही एक दैवी शक्ती त्यांच्या घरात अवतरली होती. वडीलांनी पायाजवळ हात ठेवून त्याच्या भवितव्याची कल्पना केली, तर आईच्या ममतेने त्याला एक सुरक्षेची ऊब दिली. या दिव्यत्वाची जाणीव केवळ कुटुंबापुरती नव्हती; गावातील संत आणि जाणते लोकही म्हणू लागले की हा मुलगा काहीतरी महान कार्य करण्यासाठीच या भूमीवर आला आहे. जणू कोणी तरी एक प्रकाश घेऊन पृथ्वीवर अवतरले आहे, जो पुढे समाजात नवचैतन्य निर्माण करेल. अशा असामान्य जन्मांना इतिहासात अनेकदा विशेष स्थान दिले गेले आहे. जेव्हा कृष्ण जन्माला आला, तेव्हा कारागृहात दिव्य प्रकाश पसरला होता; गौतम बुद्धांच्या जन्माच्या वेळी पृथ्वीने सात पावले घेतली होती. दादाच्या जन्मालाही अशीच एक अलौकिक जाणीव जोडली गेली. त्याच्या बालपणातील लक्षणे, त्याचे विचार, त्याची आचारधर्मता—हे सारेच त्याच्या असामान्यतेची साक्ष देत होते. दादाच्या नाव ठेवण्याचा कार्यक्रम हा कुटुंबातील सर्वांचा आनंदाचा आणि उत्साहाचा क्षण होता. संपूर्ण कुटुंब, नातेवाईक, आणि जवळचे मित्र-परिवार या विशेष सोहळ्यासाठी एकत्र जमले होते. प्रत्येकाने आपली मते मांडली आणि नाव निवडताना त्याच्या भविष्यातील व्यक्तिमत्त्व, कर्तृत्व आणि यशाचा विचार केला.शक्य तितकी अर्थपूर्ण आणि सुंदर नावे सुचवली गेली, पण शेवटी सर्वांच्या एकमताने "वैभव" हे नाव निश्चित करण्यात आले. हे नाव केवळ सहज उच्चारायला सोपे नव्हते, तर त्याचा अर्थही अतिशय गोड आणि सकारात्मक होता—समृद्धी, यश, आणि गौरवाचे प्रतीक. नावाच्या अर्थामुळे त्याच्या जीवनातही भरभराट आणि यश लाभावे, अशी प्रत्येकाची भावना होती.या सोहळ्यात घरातील वडीलधारी मंडळींनी आशिर्वाद दिले, लहानग्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मंगलाष्टके, गोडधोड जेवण, आणि पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करून कार्यक्रम संपन्न झाला. नातेवाईकांनी आणि मित्रपरिवाराने प्रेमाने त्याला नावाने हाक मारायला सुरुवात केली, आणि त्या क्षणापासून "वैभव" हे नाव त्याच्या ओळखीचा अविभाज्य भाग बनले. ही केवळ नाव ठेवण्याची प्रक्रिया नव्हती, तर त्याच्या आयुष्याच्या प्रवासाची सुरुवात होती—एक आशेचा, विश्वासाचा आणि यशाचा शुभारंभ!कुटुंबामध्ये सुवर्णफुल वाहण्याचा कार्यक्रम दादाच्या हस्ते पार पडला, हा एक विलक्षण आणि पुण्याईने प्राप्त झालेला योग आहे. अशा प्रकारच्या घटनांना फार मोठे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व असते. हा योग प्रत्येक कुटुंबामध्ये वारंवार येत नाही, कारण तो केवळ भौतिक परंपरेचा नव्हे, तर एकाच वेळी अनेक पिढ्यांच्या पुण्यकर्माचा परिणाम असतो. दादा, ज्यांच्या हातून हा शुभकार्य झाला, त्यांचा जन्मच पुण्याईतून झाल्यामुळे त्यांना हा सन्मान मिळाला. त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या चांगल्या कर्मांचे फळ त्यांना या रूपात मिळाले. कुटुंबाची सेवा, समाजासाठी निःस्वार्थपणे दिलेले योगदान, तसेच धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांबद्दल असलेली निष्ठा यामुळेच दादाच्या हातून सुवर्णफुल वाहण्याचा योग जुळून आला.हा कार्यक्रम एखाद्या कुटुंबात अनेक दशकांनी किंवा कधी कधी पिढ्यान्पिढ्यांनी एकदाच घडतो. त्यामुळे कुटुंबासाठी हा अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण असतो. सुवर्णफुल वाहणे म्हणजेच परमेश्वराच्या चरणी नतमस्तक होऊन, संपूर्ण कुटुंबाच्या पुण्याईची कबुली देण्याचा प्रसंग. यामध्ये संपूर्ण घराण्याची आध्यात्मिक उन्नती लपलेली असते. दादाच्या जीवनाचा विचार केला असता, त्यांच्या कार्याची पुण्याई, त्यांची समाजसेवा, त्यांचे सद्वर्तन आणि कुटुंबासाठी त्यांनी केलेल्या त्यागाचे फळ म्हणून त्यांना हा मान प्राप्त झाला असे म्हणता येईल. दादाने आयुष्यभर चांगल्या विचारांचा आणि उच्च संस्कारांचा आदर्श ठेवला, ज्यामुळे त्यांच्याच हातून हा शुभ कार्य घडले. सुवर्णफुल वाहण्याचा कार्यक्रम हा केवळ एका व्यक्तीचा विजय नसतो, तर संपूर्ण घराण्याच्या पुण्याईचा आणि चांगल्या विचारांचा सन्मान असतो. त्यामुळे कुटुंबानेही याचे महत्त्व ओळखून, दादाच्या कार्याचा आदर्श घेऊन पुढे जाणे आवश्यक आहे. हा योग फक्त सुदैवाने मिळत नाही, तर त्यासाठी सातत्याने चांगली कर्तव्ये, धर्माचरण आणि सत्कर्म यांची आवश्यकता असते.अंबादासराव वैद्य (अण्णा) हे अत्यंत कर्तव्यदक्ष आणि समाजाभिमुख शिक्षक होते. शिक्षण आणि संस्कार यांचा योग्य संगम कसा असावा, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यांच्या शिकवणीचा, त्यांच्या विचारांचा, आणि त्यांच्या वर्तनाचा सर्वांत जवळून प्रभाव दादांवर पडला. दादा लहान असतानाच अण्णांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कार करायला सुरुवात केली. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापर्यंत मर्यादित नसते, तर ते जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करणारे असते हा विचार अण्णांच्या मनात ठाम होता. त्यामुळे त्यांनी दादांना वाचनाची, प्रश्न विचारण्याची आणि आत्मचिंतनाची सवय लावली. घरात आणि शाळेत जे काही शिकवले जात होते, त्याचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात कसा करायचा, यावर अण्णा विशेष भर द्यायचे. अण्णा हे केवळ शिक्षक नव्हते, तर ते उत्तम निरीक्षकही होते. शिक्षक म्हणून त्यांचा अनुभव मोठा असल्याने मुलांमधील गुणवत्ता अचूक ओळखण्याची त्यांची क्षमता अफाट होती. दादांमध्ये असलेली बौद्धिक क्षमता, जिज्ञासा, आत्मविश्वास, आणि नेतृत्वगुण त्यांनी लहानपणीच ओळखले. त्यामुळे त्यांच्या विकासासाठी योग्य दिशा ठरवणे अण्णांनी अगदी सहज केलं. ते नेहमी म्हणायचे की, "गुण असणे पुरेसे नाही; ते सुसंस्कारीत आणि विधायक मार्गाने वाढवायला हवेत." म्हणूनच त्यांनी दादांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता व्यवहारज्ञान, कष्ट करण्याची तयारी, सामाजिक भान आणि आदर्श मूल्ये शिकवली. अण्णांनी दादांना शिस्तप्रियतेचे धडे दिले. वेळेचे महत्त्व, नीटनेटकेपणा, प्रामाणिकपणा आणि स्वावलंबन ही मूल्ये त्यांनी बालपणापासून रुजवली. त्यांनी दादांना सांगितले की, "ज्ञान मिळवण्याइतकेच ते योग्य रीतीने वापरणेही महत्त्वाचे असते." त्यामुळे अभ्यासातल्या शिस्तीबरोबरच सामाजिक जबाबदारीची जाणीवही त्यांना करून दिली. अण्णा हे केवळ कुटुंबापुरते सीमित नव्हते; त्यांचा समाजावरही मोठा प्रभाव होता. त्यामुळे त्यांनी दादांनाही लहान वयातच समाजकार्याची ओळख करून दिली. मदतीची वृत्ती, सहकार्याची भावना, आणि कोणत्याही परिस्थितीत नैतिकतेला सोडून न देण्याचा धडा त्यांनी शिकवला. अण्णांच्या संस्कारांमुळे दादांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले. त्यांच्यातील आत्मविश्वास, विचारशक्ती, आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक होत गेला. अण्णांच्या मार्गदर्शनामुळे दादांना केवळ शिक्षणच नव्हे, तर जीवनाची खरी समजही आली. आजही दादांच्या विचारसरणीत आणि आचरणात अण्णांचे संस्कार स्पष्टपणे दिसतात.दादांचे लहानपण: खोडकर, मनमिळावू आणि निर्भय स्वभावाचे प्रतिबिंब. दादा लहानपणी अतिशय खोडकर होते. त्यांच्यात असलेली ऊर्जा आणि चंचलता घरातल्यांना आणि मित्रमंडळींना नेहमीच भुरळ घालायची. त्यांना बसून राहायची सवय नव्हती. सतत काहीतरी नवीन शोधायचे, खेळायचे, आणि मित्रांसोबत धमाल करायची हीच त्यांची दिनचर्या असायची. मात्र त्यांच्या खोडकरपणात कधीही द्वेष किंवा इतरांना त्रास देण्याचा हेतू नव्हता. उलट, ते त्यांच्या मित्रांना नेहमी मदतीचा हात द्यायचे आणि सगळ्यांना सोबत घेऊन खेळायचे. दादांना लहानपणापासूनच संघटित खेळांची आवड होती. ते स्वतःसाठी काही करायच्या ऐवजी, सगळ्यांना सोबत घेऊन खेळण्याचा त्यांचा स्वभाव होता. क्रिकेट, लपंडाव, गोट्या, भिंगरी, साखळी असे अनेक खेळ त्यांना आवडायचे, पण त्यातही त्यांची खासियत म्हणजे प्रत्येक खेळात संघटनेचे महत्त्व पटवून देणे. कोणी एकटा पडू नये, प्रत्येकाला संधी मिळावी आणि सगळ्यांनी मिळून आनंद घ्यावा, यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असायचे. कधी कोणी भांडण करून गप्प बसला, तर त्याला समजवायचे, कोणी नवीन खेळ शिकण्यात मागे राहिला, तर त्याला मदत करायची—ही त्यांची नैसर्गिक वृत्ती होती. त्यामुळेच त्यांच्या मित्रमंडळींमध्ये ते नेहमी लाडके आणि विश्वासू मानले जायच. दादा कोणत्याही परिस्थितीत कोणालाही दूर करत नसत. गरीब-श्रीमंत, मोठा-लहान, हुशार-कमी हुशार अशा कोणत्याही भेदभावाशिवाय सगळ्यांशी मिळून-मिसळून राहायचे. त्यांच्या या मनमिळावू स्वभावामुळे त्यांची मोठी मित्रमंडळी होती, आणि त्यांच्यावर सगळे प्रेम करत. कोणी दुखी असेल, कोणी काही हरवले असेल, किंवा कोणी काही समजून घेत नसेल, तर त्याच्या मदतीला दादा धावून जायचे. दादा सहजपणे कोणत्याही गोष्टीला घाबरत नसत. खेळात असो वा अभ्यासात, स्पर्धांमध्ये असो वा नवीन कौशल्य शिकण्यात—त्यांना नेहमी नवीन गोष्टी करण्याची इच्छा असायची. ज्या गोष्टी इतर मुलांना कठीण वाटायच्या, त्या गोष्टी करण्याची त्यांना खास आवड होती. उंच झाडावर चढायचे, खोल पाण्यात उडी मारायची, रात्री-अपरात्री कुठेही जायची, नवीन जागा शोधायच्या—यासारख्या गोष्टींमध्ये त्यांना भीती वाटायचीच नाही. मोठी मुलेसुद्धा कधी-कधी घाबरत असले, तरी दादा निर्धास्त असायचे. "भित्री माणसं कधी पुढे जात नाहीत, आव्हानं स्वीकारली की आपण मोठे होतो"—असा त्यांचा दृष्टिकोन लहानपणापासूनच होता. त्यांचा स्वभाव इतका उत्साही आणि आनंदी होता की, जिथे जाईल तिथे ते पटकन सगळ्यांमध्ये मिसळून जात. आजोळ असो, नातेवाईकांचा घरी असो किंवा नवीन गावात—त्यांना कोणाशी बोलायला वेळ लागत नसे. नवीन मित्र तयार करणे, त्यांच्याशी खेळणे आणि त्यांच्या आवडी-निवडी जाणून घेणे हा त्यांचा विशेष गुण होता. दादांच्या या गुणांना योग्य दिशा देण्याचे काम अण्णांनी केले. त्यांच्या खोडकरपणाला त्यांनी सुसंस्कारीतपणाची जोड दिली. आव्हान स्वीकारण्याच्या वृत्तीला जबाबदारीची जाणीव दिली आणि त्यांच्या संघटित स्वभावाला नेतृत्वगुणांची जोड दिली. त्यामुळे दादा केवळ एक खेळकर आणि निर्भय मुलगा राहिला नाही, तर तो समाजासाठी कार्य करणारा, प्रत्येकाशी जुळवून घेणारा, आणि आव्हानांना सामोरे जाणारा कणखर व्यक्ती बनला. दादांचे बालपण म्हणजे उर्जेचा, उत्साहाचा, आणि मित्रत्वाच्या नात्याचा सुंदर संगम होता. त्यांचा खोडकर आणि मनमिळावू स्वभाव, आव्हान स्वीकारण्याची ताकद, आणि सगळ्यांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती पुढेही त्यांच्या आयुष्यात उपयोगी पडली. त्यांच्या या गुणांमुळेच ते केवळ मित्रांचा लाडका नव्हे, तर कुटुंबाचा आधार आणि समाजाचा जबाबदार व्यक्तीमत्त्व म्हणून घडले.ओढ्यातील खेळ आणि निर्भय स्वभाव दादा लहानपणी गावातील ओढ्यामध्ये, म्हणजेच लेंडीमध्ये, तासन् तास खेळत असत. पावसाळ्यात ओढ्यात पाणी साठायचं आणि ते पाहून त्यांच्या उत्साहाला उधाण यायचं. लहानपणीच निसर्गाशी आणि पाण्याशी त्यांची गट्टी झाली होती. झऱ्यातून वाहणाऱ्या पाण्याचे निरीक्षण करणे, त्यात वेगवेगळे प्रयोग करणे, आणि आपली कल्पकता वापरून छोटे छोटे बांध घालणे—ही त्यांची लहानपणीची खासियत होतीपावसाळ्यात गावाच्या ओढ्यातून पाणी वाहू लागले की, दादा आणि त्यांचे मित्र तिथे जमत. हाताने माती, गवत, लाकडे, आणि दगड गोळा करून ते छोटे छोटे बांध तयार करायचे. पाण्याचा प्रवाह कसा वळतो, तो अडवला की काय होते, वेग कमी झाला की बाजूने कसा झिरपतो हे सगळे ते आपोआप शिकत होते. "आपण बांधलेला बांध किती वेळ टिकतो?", "त्याला अजून मजबूत कसं करता येईल?" अशा गप्पा चालायच्या.कधी तरी कोणीतरी मोठ्या माणसाने त्यांचा बांध मोडला किंवा अचानक पाण्याचा जोर वाढला की, पुन्हा नव्याने प्रयत्न करायचे. "आम्ही पाणी अडवू शकतो" ही जाणीव त्यांच्या लहान वयातच तयार झाली होती. त्यांच्या खेळातूनच त्यांचा संघटित वृत्ती, प्रयोगशीलता, आणि चिकाटीचा स्वभाव तयार झाला. दादांना फक्त ओढ्यात खेळायला आवडायचं असं नाही, तर तिथे सापडणाऱ्या वेगवेगळ्या जलचर प्राण्यांबद्दल त्यांना अपार कुतूहल होतं. गावातली इतर मुलं जिथे बेडूक, खेकडे, किंवा साप पाहून घाबरायची, तिथे दादा मात्र उत्सुकतेने त्यांना उचलून बघायचे. बेडूक: पावसाळ्यात ओढ्याच्या काठावर मोठमोठे बेडूक दिसायचे. दादा त्यांना सहज हाताळायचे. काही वेळा त्यांना उचलून पाहायचे, त्यांच्या उड्या बघायच्या, आणि पाण्यात सोडून द्यायचे. "बेडूक कसा पकडायचा?", "त्याची कातडी ओलसर का असते?", "तो किती उडी मारू शकतो?"—असे वेगवेगळे प्रयोग करून ते त्यांना समजून घ्यायचे. साप: काही वेळा ओढ्याच्या काठावर छोटे पाणसाप दिसायचे. इतर मुलं दूर पळायची, पण दादा मात्र न घाबरता त्यांचं निरीक्षण करायचे. "हा बिनविषारी आहे का?", "तो पाण्यात किती काळ राहू शकतो?" अशा प्रश्नांची उत्तरे ते शोधायचे. खेकडे: खडकांच्या मधून किंवा चिखलातून निघालेले खेकडे पकडण्याची त्यांना विशेष मजा यायची. त्यांच्या चिमट्यांचा अभ्यास करणे, ते माणसाला धरतात का, ते पळताना कसे दिसतात हे पाहताना त्यांना वेगळाच आनंद मिळायचा. दादांची ही निर्भय वृत्ती त्यांना लहानपणापासूनच उपयोगी पडली. पाण्याच्या प्रवाहाला हात घालणं, बेडूक-साप-खेकड्यांना हाताळणं यामुळे त्यांच्यात निसर्गाविषयी आदर, अभ्यासू वृत्ती, आणि भीती न बाळगण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. अनेक जण जिथे गोंधळून जात किंवा मागे हटत, तिथे दादा मात्र पुढे जाऊन "हे काय आहे?" याचा शोध घ्यायचे. पप्पांनी दादांच्या या स्वभावाला योग्य दिशा दिली. "भीती कधीच उपयोगाची नसते, पण निसर्गाच्या नियमांना समजून घेणं महत्त्वाचं आहे" असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळेच दादा फक्त निर्भय राहिले नाहीत, तर त्यांनी निसर्ग निरीक्षणाची सवय, प्रयोगशीलता, आणि आत्मविश्वास विकसित केला. दादांचं बालपण म्हणजे निसर्गाशी जोडलेलं, प्रयोगशील आणि निर्भयतेचं प्रतीक होतं. गावाच्या ओढ्यात पाण्याशी खेळत त्यांनी संघटित वृत्ती, चिकाटी, आणि प्रयोगशीलता शिकली. बेडूक, साप, खेकडे यांना हाताळून निसर्गाविषयी गहन समज निर्माण केली. हा अनुभव पुढे त्यांच्या संपूर्ण जीवनात उपयोगी ठरला आणि त्यांना निर्भय, जिज्ञासू आणि आत्मविश्वासी व्यक्तीमत्त्व घडवण्यात मदत केली.दादांच्या शिक्षणाची सुरुवात मुरुम येथील नूतन प्राथमिक शाळेत झाली. त्यांच्या बालपणीच्या जडणघडणीमध्ये या शाळेतील शिक्षकांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दादाचे माध्यमिक शिक्षण अत्यंत सक्रिय आणि बहुआयामी होते. दादाला लहानपणापासूनच खेळांमध्ये विशेष रुची होती, मात्र माध्यमिक शिक्षण घेत असताना त्याचा ओढा शटल बॅडमिंटनकडे विशेषतः वाढला. या खेळातील कौशल्ये आत्मसात करण्यासाठी त्याने अथक परिश्रम घेतले.नियमित सराव, योग्य मार्गदर्शन आणि जिद्द यांच्या जोरावर त्याने स्वतःचा खेळ उंचावला.खेळासोबतच दादाला वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घेण्याची आवड होती. त्याच्या वक्तृत्व शैलीला धार मिळावी म्हणून त्याने वेगवेगळ्या विषयांवर चिंतन करणे, उत्तम ग्रंथांचे वाचन करणे आणि प्रभावी भाषण तंत्र आत्मसात करणे सुरू केले. विविध शालेय आणि जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये त्याने सहभाग घेतला आणि उत्तम कामगिरी केली. त्याच्या ओजस्वी वक्तृत्वशैली ने सर्वांना जिंकून घेतले. याशिवाय, निबंध लेखनातही त्याला विशेष रुची होती. विविध विषयांवर त्याने सखोल विचार करून निबंध लिहिले, ज्यामुळे त्याचा लेखन कौशल्याचा विकास झाला. त्याच्या लेखनशैलीत विचारसंपन्नता, कल्पकता आणि स्पष्टता होती. वाचनाची सवय दादाला लहानपणापासूनच होती, मात्र माध्यमिक शिक्षण काळात त्याने वेगवेगळ्या विषयांवर पुस्तके वाचण्याचा ध्यास घेतला. इतिहास, समाजशास्त्र, विज्ञान, तत्त्वज्ञान, साहित्य अशा विविध विषयांतील ग्रंथ त्याने अभ्यासले. त्याच्या वाचनाने त्याच्या विचारसरणीत सखोलता आणि व्यापकता आली. विविध महान व्यक्तींचे चरित्र वाचून त्याला प्रेरणा मिळाली आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वावर त्याचा सकारात्मक परिणाम झाला. माध्यमिक शिक्षण काळातील या सर्व अनुभवांमुळे दादाचे व्यक्तिमत्त्व बहरले. खेळ, वक्तृत्व, लेखन आणि वाचन या सर्व क्षेत्रांत त्याने मिळवलेले ज्ञान आणि कौशल्ये त्याच्या पुढील प्रवासासाठी उपयोगी ठरली. पाथरूड सरांसारख्या मार्गदर्शक शिक्षकांच्या मदतीने आणि स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर त्याने त्याचे शिक्षण आणि उपक्रम यामध्ये सातत्य ठेवले. या सर्वांगीण वाढीमुळे तो केवळ एका चांगल्या विद्यार्थ्याच्या भूमिकेतच नव्हे, तर एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे विकसित झाला.लहानपणीच परिस्थितीची जाणीव होणं ही काहीशी कठीण आणि वेदनादायी गोष्ट असते, पण काहींना तीच जाणीव अधिक परिपक्व बनवते. दादाला हे लवकरच उमजलं होतं की, आपली आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही. घरी आई-वडिलांचे संभाषण तो ऐकायचा आणि त्यातून त्याला आपल्या कुटुंबाच्या संघर्षांची कल्पना येऊ लागली. वडिलांची मेहनत, आईचा त्यांना दिलासा आणि आधार हे सगळं त्याच्या डोळ्यांसमोर घडत होतं. या परिस्थितीतून बाहेर पडायचं असेल, तर अभ्यास हाच एकमेव मार्ग आहे, हे त्याने अगदी लहान वयातच ओळखलं. अभ्यासाकडे त्याचा कल आधीपासून होता, पण आता त्याने त्याला एक वेगळाच ध्यास दिला. कोणतीही अडचण आली तरी अभ्यासावरच लक्ष केंद्रित करायचं, कोणत्याही संकटाने मागे हटायचं नाही, हे त्याने स्वतःशी ठरवून टाकलं. घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम होती. त्यामुळे दादाला खेळण्यांचे, मौजमजेसाठी पैसे सहज मिळत नव्हते. पण त्याने कधी त्याची तक्रार केली नाही. त्याच्या मनात सतत एक विचार असायचा—"आपल्या मेहनतीने आपण परिस्थिती बदलू शकतो." त्याने अभ्यासात स्वतःला झोकून दिलं. शिक्षकांचे मार्गदर्शन, पुस्तकं, परीक्षेत उत्तम गुण मिळवणं—हेच त्याचे ध्येय बनले. वडिलांच्या कष्टांबद्दल त्याला अभिमान होता. ते कसंही करून कुटुंबासाठी पैसे मिळवत होते, आई घर सांभाळत होती, आणि या दोघांच्या प्रयत्नांना फळ मिळवून देण्याची जबाबदारी दादाने स्वतःवर घेतली. तो दिवस-रात्र मेहनत करू लागला. शाळेत नेहमी पहिल्या क्रमांकावर राहण्याचा प्रयत्न करायचा. शिक्षकांनी दिलेलं प्रत्येक ज्ञान तो मनापासून आत्मसात करायचा. हळूहळू त्याच्या मेहनतीचं चीज होऊ लागलं. परीक्षा उत्तीर्ण होताना त्याला मिळणाऱ्या यशाने आई-वडिलांच्या डोळ्यात अभिमानाचे अश्रू दिसू लागले. त्याच्या जिद्दीमुळे, सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे तो स्वतःला सिद्ध करत गेला. आजही त्याने घेतलेला निर्धार, परिस्थिती बदलण्यासाठी घेतलेली मेहनत आणि शिक्षणावर ठेवलेला विश्वास, हे त्याच्या प्रवासातली महत्त्वाची पायरी आहे. हा प्रवास फक्त त्याचा नव्हता, तर संपूर्ण कुटुंबाचा होता. वडिलांनी दिलेला धीर, आईने दिलेला मानसिक आधार आणि त्याने स्वतःला घडवण्यासाठी घेतलेला कठोर निर्णय या सगळ्याचा मिलाफ म्हणजे त्याची यशोगाथा आहे.मुरूम येथील प्रतिभा निकेतन ज्युनियर कॉलेजमध्ये वैभव दादाने अकरावी आणि बारावीचे शिक्षण पूर्ण केले. ग्रामीण भागातील शिक्षणाच्या मर्यादा असूनही त्याने स्वतःच्या मेहनतीवर विश्वास ठेवून यश मिळवण्याचा निर्धार केला. मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या शिकवणी वर्ग, खासगी मार्गदर्शन, आणि रेडीमेड नोट्स यांचा त्याला कोणताही लाभ नव्हता. पण अडचणींवर मात करून, अभ्यासाची ओढ कायम ठेवत, मेरिटची झेप घेण्याचे त्याने ठरवले. अकरावीची सुरुवात झाल्यावर दादाने अभ्यासावर संपूर्ण लक्ष केंद्रित केले. कोणतीही बाह्य मदत न मिळाल्याने त्याने शाळेतील पुस्तकांवर आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनावर भर दिला. रोज शिकवले गेलेले विषय तो पुन्हा-पुन्हा वाचत असे. त्याला उमगले की, सततचा सराव आणि नियमित अध्ययन हाच यशाचा खरा मार्ग आहे. बारावीच्या वर्षात अभ्यासाची कठीणता अधिक वाढली. अनेक विद्यार्थी क्लासेस आणि मार्गदर्शन पुस्तिकांवर अवलंबून होते. परंतु दादाने कोणत्याही सोयी-सुविधेशिवाय, स्वतःच्या कष्टाच्या जोरावर अभ्यास सुरू ठेवला. त्याने वेळेचे योग्य नियोजन करून सर्व विषयांचा खोलवर अभ्यास केला. शंका आल्या की, तो शिक्षकांना विचारत असे आणि अभ्यास पूर्ण समजून घेतल्याशिवाय शांत बसत नसे. ही दोन वर्षे त्याने अविश्रांत मेहनत घेतली. प्रत्येक परीक्षा, चाचणी, आणि सराव पेपर यांना तो गंभीरपणे सामोरा गेला. शेवटी त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ त्याला मिळाले. बारावीच्या परीक्षेत त्याने चांगले गुण मिळवत यश संपादन केले. दादाने आपले शिक्षण फक्त गुण मिळवण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून शिक्षणाचा खरा अर्थ जाणण्यासाठी केले. दादा बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर, त्याने परभणी येथील कृषी विद्यापीठात पदवीसाठी प्रवेश घेतला. त्याचा प्रवेश गुणवत्ता यादीत पहिल्याच क्रमांकावर झाला होता, त्यामुळे संपूर्ण कुटुंबाला त्याचा अभिमान वाटत होता. येथे दादाला आमचे काका म्हणजेच श्री मंदार वैद्य याची मार्गदर्शन मिळाले. कृषी विद्यापीठातील वातावरण त्याच्या बौद्धिक व वैचारिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरले. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून कृषीशास्त्राची सखोल माहिती मिळवण्यासोबतच त्याने स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठीही विशेष लक्ष द्यायला सुरुवात केली. परभणी कृषी विद्यापीठ हे संपूर्ण महाराष्ट्रात कृषी अभ्यासासाठी प्रसिद्ध आहे. येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळा जिद्द आणि स्पर्धेची भावना होती. प्रत्येक वर्षी येथे शिकणारे विद्यार्थी MPSC, UPSC आणि इतर स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होत असत. दादानेही ही प्रेरणा घेत अभ्यासाची रणनीती आखली. त्याला अभ्यासाची आवड तर होतीच, पण उत्तम मार्गदर्शन मिळाल्यामुळे त्याची जिद्द अधिकच बळकट होत गेली. विविध विषयांतील तज्ज्ञ प्राध्यापक, अभ्यासू विद्यार्थी, तसेच विद्यापीठातील अभ्यासकेंद्री वातावरण यामुळे त्याच्या ज्ञानात सातत्याने भर पडत होती. दादाने लहानपणापासूनच वीर सावरकरांचे विचार ऐकले होते आणि त्याचा प्रभाव त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होता. त्याने नेहमीच कठीण परिस्थितीत हार न मानण्याचा आणि स्वतःला सर्व प्रकारच्या परिस्थितींमध्ये तयार करण्याचा ध्यास घेतला होता. विद्यापीठातील भोजनव्यवस्था त्याला विशेष पसंत नव्हती, पण त्याने याकडे दुर्लक्ष करून आपला अभ्यास अधिक गंभीरपणे चालू ठेवला. सौ.आई आणि पप्पा त्याच्या तब्येतीबाबत काळजीत असायचे, पण दादाने अभ्यासाशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीकडे लक्ष दिले नाही. त्याचे एकच तत्व होते शिक्षण आणि परिश्रम. विद्यापीठात शिकताना दादा अभ्यासात तर उत्कृष्ट होता, पण त्याचबरोबर मित्रांमध्येही अत्यंत आपुलकीने वागत असे. त्याच्या स्वभावात कधीच अहंकार नव्हता. तो नेहमी इतरांना मदत करायचा, त्यांच्या समस्यांमध्ये मार्गदर्शन करायचा. त्यामुळे त्याचा मित्रपरिवार मोठा होता आणि सगळे त्याला मनापासून मानत असत. कोणत्याही विषयावर चर्चा असो, दादाची विचारसरणी नेहमीच तर्कशुद्ध आणि प्रेरणादायी असे. दादा आणि पप्पा यांचे नाते अत्यंत वेगळे होते. त्यांचे संवाद म्हणजे केवळ साधे बोलणे नव्हते, तर ती एक प्रकारची आध्यात्मिक प्रक्रिया असे. पप्पा त्याला सदैव अर्जुनाप्रमाणे समजावत असत—"लक्ष केंद्रित कर, बाकी सर्व विसर." दादा पत्राद्वारे पप्पांशी संवाद साधत असे, आणि प्रत्यक्ष भेट झाल्यावर त्यांच्यात अभ्यास, जीवनमूल्ये, ध्येयनिश्चय यावर खोलवर चर्चा होत असे. या मार्गदर्शनामुळे दादाची वैचारिक समृद्धी अधिकच वाढत गेली. परभणी कृषी विद्यापीठात शिक्षण घेत असताना दादाची प्रगल्भता वाढत गेली. तो केवळ अभ्यासातच नव्हे, तर विचारशक्ती, जीवनदृष्टी आणि आत्मसंस्कार यामध्येही पुढे जात होता. कठीण परिस्थितीला सामोरे जाण्याची ताकद, शिस्तबद्ध दिनचर्या आणि जिद्द यामुळे त्याचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडत गेले. त्याची मेहनत आणि चिकाटी पाहता भविष्यात तो मोठे यश संपादन करणार, याची खात्री त्याच्या शिक्षकांनाही वाटत होती. या संपूर्ण प्रवासात दादाने केवळ पदवी मिळवली नाही, तर शिक्षणाच्या माध्यमातून एक विचारशील, आत्मनिर्भर आणि ध्येयवादी व्यक्ती म्हणून स्वतःला घडवले. त्याची ही जडणघडण पुढील आयुष्यात त्याला अधिक मोठ्या संधी मिळवून देणार होती. एमपीएससीच्या एका जाहिरातीने दादाच्या आयुष्याला एक नवा वळण दिला. शेवटच्या पदवीच्या वर्षाला असताना एक्साईज ऑफिसर पदासाठी परीक्षा जाहीर झाली. परीक्षा अर्ज भरताना त्याने पप्पांना सांगितले, "माझा अभ्यास पूर्ण झालाय. आता फक्त परीक्षा द्यायची आहे." हा आत्मविश्वास ऐकून घरच्यांना आनंद तर झाला, पण काळजीही वाटली. परीक्षा अत्यंत स्पर्धात्मक होती, हजारो उमेदवार त्यासाठी तयारी करत होते. मात्र, दादाच्या निर्धारात जराही शंका नव्हती. त्याने आपली संपूर्ण तयारी आधीच पूर्ण केली होती. दादाची परीक्षा केंद्र संभाजीनगरच्या एका कॉलेजमध्ये होती. तो पहाटेच उठला, नेहमीप्रमाणे स्वतःला शांत ठेवत त्याने आवश्यक नोट्स पुन्हा एकदा वाचून काढल्या. परीक्षा सुरू झाली आणि अवघ्या एका तासातच त्याने संपूर्ण पेपर सोडवला! पेपर संपल्यानंतर बाहेर येऊन तो हसत म्हणाला, "मी महाराष्ट्रात पहिला येणार!" त्याचा तो आत्मविश्वास पाहून आम्ही सर्व जण थक्क झालो. काहींनी त्याच्या बोलण्याची चेष्टाही केली. परंतु आम्हाला माहीत होते की हा आत्मविश्वास फक्त गृहीतक नव्हे, तर त्याच्या मेहनतीवर आधारित आहे. काही दिवसांतच निकाल जाहीर झाला. त्या दिवशी दुपारी बारा वाजता महालक्ष्मीची महाआरती चालू असताना ही सुवार्ता घरात पोहोचली. आई पप्पांना कानावर बातमी आली सौ. आईच्या श्रद्धेला, पप्पांच्या कष्टाला, आजी-आजोबांच्या पुण्याईला हे फळ मिळाले. साक्षात महालक्ष्मीनेच आशीर्वाद दिल्यासारखे वाटले. तो क्षण अविस्मरणीय होता संपूर्ण घरभर आनंदाश्रू वाहू लागले. पुढील टप्पा होता मुलाखतीचा, जिथे केवळ ज्ञान नव्हे, तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्व, आणि विचारसंपन्नता महत्त्वाची असते. दादाने आधीच तयारी केली होती आणि त्याने मुलाखतीमध्ये अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी केली. त्याच्या प्रत्येक उत्तरामध्ये विचारांची स्पष्टता आणि प्रशासनिक जाण दिसून आली.आज दादा फक्त आमच्या कुटुंबाचा अभिमान नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक प्रेरणादायी उदाहरण आहे. त्याच्या जिद्दीमुळे आणि निश्चयामुळे त्याने प्रशासनिक सेवेत प्रवेश केला आणि आजही त्याच आत्मविश्वासाने कार्यरत आहे.अखेर त्याच कठोर परिश्रमांचे, अदम्य इच्छाशक्तीचे आणि सेवा भावनेचे फलित म्हणून त्यांची एसपी पदावर निवड झाली. त्यांच्या या नियुक्तीमुळे कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार, तसेच मुरूम, मोगरगा नगरीत अभिमान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**प्रो डॉ. विशाल विजयकुमार वैद्य**
**गांधी महाविद्यालय कडा**
**मो. ८२७५२७४१६०**

**शब्दांकन**
**प्रा. सुधीर पंचगल्ले**
**मुरूम**